आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ०७ वे ● अंक २९८ वा ● बुधवार दि. १७ एप्रिल २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

### किडनी स्टोन व दाहक–विरोधी औषध निर्मितीसाठी डॉ.रवींद्र शिंदे यांना भारतीय पेटंट

लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील प्रा.डॉ.आर.एस.शिंदे यांना किडनी स्टोन व दाहक–विरोधी औषधासाठी केलेल्या संशोधनाला भारतीय पेटंट मिळाले आहे.त्यांनी १,३.५ ट्रायझिन पायराझोलिन्स एक दाहक–विरोधी आणि अँटीयुरोलिथिक एजंट यांचा सखोल अभ्यास केला व त्यांच्या या संशोधनाला भारतीय पेटंट मिळाले आहे. अँटीयुरोलिथिक म्हणजे मूत्रमार्ग,मूत्राशय किंवा किडनीमधील दगड रोखणे किंवा विरघळणे होय.पाषाणभेद कॅल्शियम ऑक्सलेट मोनोहायड्रेट क्रिस्टल्सच्या वाढीस प्रतिबंध करते,जे किडनी किंवा मूत्रमार्गातील दगडांच्या निर्मितीसाठी जबाबदार आहे.पाषाणभेद हे औषधी गुणधर्मांमुळे मूत्रपिंड आणि मूत्राशयातील दगड,मूत्र समस्या आणि इतर रोगांच्या व्यवस्थापनासाठी वापरले जाते.भारतीय पारंपरिक औषधांमध्ये अँटीयुरोलिथिक प्रभाव म्हणून ओळखले जाते.

# भाजपा चे संकल्पपत्र ही देशाच्या समृद्धीची गॅरंटी!
## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

मुंबई : भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीसाठी जाहीर केलेले संकल्पपत्र हा केवळ कागदी आश्र्वासनांचा पेटारा नसून जनतेच्या आशा आणि अपेक्षा पूर्ण करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदींची गॅरंटी आहे. या संकल्पपत्रातील प्रत्येक संकल्प पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पार्टी संपूर्ण ताकदीने अथक परिश्रम करणार असून समाजातील शेवटच्या स्तरावरील व्यक्तीपर्यंत विकासाची फळे पोहोचविण्याचा पक्षाचा निर्धार आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी नागपूर येथे पत्रकार परिषदेत दिली. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व अन्य नेते यावेळी उपस्थित होते.

महिला शक्ती, युवा शक्ती, शेतकरी आणि गरीब या समाजघटकांना अधिक सक्षम करून देशाला समृद्ध करण्याची मोदी यांची गॅरंटी आहे, असे नमूद करत श्री.फडणवीस म्हणाले की, काँग्रेसचा जाहीरनामा हे त्यांच्या अपयशाचे प्रतिबिंब आहे. दीर्घ काळ सत्तेत असतानाही काँग्रेसने याआधी जाहीरनाम्यातून दिलेले एकही आश्र्वासन पूर्ण केलेले नाही अशी टीकाही त्यांनी केली. भाजपा च्या संकल्प पत्रातील प्रत्येक मुद्दा ही रोजगारनिर्मितीची ग्वाही असून भाजपाचा संपूर्ण



जाहीरनामा रोजगारनिर्मितीला समर्पित आहे, असे निःसंदिग्ध प्रतिपादनही श्री.फडणवीस यांनी केले.

श्री. फडणवीस म्हणाले की, देशभरातील सुमारे ३० लाख नागरिकांनी विविध माध्यमांतून केलेल्या सूचनांचा व्यापक विचार करण्यात आल्याने, भाजपाचे संकल्पपत्र सर्वसमावेशक आणि प्रत्येक समाजघटकाच्या विकासाचा विचार करणारे झाले आहे. देशातील ८० कोटी लोकसंख्येला पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेतून मोफत धान्य देण्याची योजना मोदी सरकारने २०20 मध्ये सुरू केली. ही योजना पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्याचा मोदी सरकारचा संकल्प असून, आयुष्मान भारत योजनेतून पाच लाखांपर्यंतचे आरोग्य संरक्षण, ७० वर्षांवरील नागरिकांना मोफत उपचार, पीएमआवास योजनेतून आणखी तीन कोटी घरे, प्रत्येक घरात पाईपद्वारे घरगुती गॅसजोडणी, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून पहिल्या टप्प्यात एक कोटी घरांना सौरसंयंत्रे देऊन मोफत वीज, दहा लाखांपर्यंतच्या विनातारण कर्जाची मर्यादा वीस लाखांपर्यंत वाढविणे, सामान्य घरांतील महिलांना व तरुणांना व्याजमुक्त व विनातारण कर्ज मिळणार. पीएम किसान कल्याण योजनेअंतर्गत पुढील पाच वर्षांसाठी वार्षिक सहा हजार रुपये देण्याची मोदी यांची गॅरंटी आहे, महाराष्ट्रातील महायुती सरकार यामध्ये सहा हजाराची भर टाकत असल्याने शेतकऱ्यांना बारा हजार रुपयांचे अर्थसाह्य मिळत आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

पीएम पीकविमा योजना अधिक मजबूत करण्यात येणार असून गेल्या पाच वर्षांत प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ करण्यात आली आहे, **(पान ४ वर)**..

### लातूर जिल्ह्यात आक्षेपार्ह गाणी वाजविण्यास मनाई

लातूर, : लातूर जिल्ह्यात 'हर टोपीवाला भी सर झुकाके जय श्रीराम बोलेगा' 'मंदिर वही बनायेंगे', 'तेरे मक्का और मदिना में शिव का डंका बजता है', 'दूर हटाओ अल्ला वालो' सारखी आक्षेपार्ह गाणी किंवा इतर आक्षेपार्ह गाणी सार्वजनिक ठिकाणी वाजविणे, त्या गाण्याची सीडी, कॅसेट सार्वजनिक ठिकाणी प्रदर्शित करणे व ताब्यात ठेवणाऱ्यावर श्रीरामनवमी सणानिमित मिरवणुकीमध्ये बंदी घालण्यात आली आहे. जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत.

धार्मीक व सामाजिक शांततेला बाधित करणारे कोणतेही कृत्य करण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध करण्यात आला आहे. संपुर्ण जिल्हाभर फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) ची अधिसूचना लागू करण्यात आली. हे आदेश १७ एप्रिल, २०२४ चे ००.०१ वाजता पासून ते १७ एप्रिल, २०२४ चे या २४.०० वाजेपर्यंत लागू राहतील, असे आदेशात नमूद करण्यात आले .

### मतदार जनजागृती अभियानात जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशनचा उस्फुर्त सहभाग.....

लातूर : जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी सर्व संस्था, संघटना आणि आस्थापनानी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी केले आहे या आवाहनाला



प्रतिसाद देत लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या वतीने मतदानासाठी येणाऱ्या मतदारांना प्रवासी भाड्यात १० टक्के सूट देण्यात आली आहे तर लातूरच्या प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने मतदान जागृती करणारे फलक सर्व खासगी प्रवासी वाहनात दर्शनी भागात लावण्यात येत आहेत.

निवडणूक हा लोकशाहीचा सर्वोच्च उत्सव असून या उत्सवात समाजातील जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे. मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन लोकशाही बळकट करावी असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी केले आहे. गेल्या लोकसभेत ६२ टक्के मतदान झाले होते मात्र यावेळी मतदानाची टक्केवारी वाढवून एक नवा लातूर पॅटर्न निर्माण व्हावा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत अशी साद घातली आहे. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या वतीने मतदान करण्यास येणाऱ्या व जाणाऱ्या प्रवाशांना प्रवास भाड्यात १० टक्के सूट देण्याचा निर्णय घेतला आहे. दिनांक ५, ६ मे २०२४ तारखेला मतदान करण्यास लातूर जिल्ह्यात येणाऱ्या सर्व प्रवाशांना आणि दिनांक ७, ८ मे २०२४ या दिवशी मतदान करून जाणाऱ्या प्रवाशांना ही सूट लागू असेल. प्रवाशांनी आपले आधार कार्ड किंवा मतदान कार्ड सोबत ठेवावे. तर मतदान करून जाणाऱ्या प्रवाशांनी मतदान केल्याची बोटावरील शाई दाखवणे बंधनकारक आहे.

यसोबतच लातूर प्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने मतदान जनजागृती फलक उपलब्ध करून देण्यात आले आहेत हे फलक लातूर जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या वतीने सर्व खासगी प्रवासी वाहनात दर्शनी ठिकाणी लाऊन या अभियानात सहभाग नोंदविला आहे. मुंबई, हैद्राबाद, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अहमदाबाद या शहरात असणाऱ्या लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदार बंधू भगिनींनी या संधीचा लाभ घेऊन मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# भाजपा जाहीरनामा म्हणजे विकासाचे अधिष्ठान आ. संभाजी पाटील निलंगेकर

लातूर/प्रतिनिधी : भाजपाने २०१९ च्या निवडणुकीत जो जाहीरनामा प्रकाशित केला होता त्यातील सर्वच संकल्पांची पुर्तता करण्यात आली आहे. विकासाचे घोषणापत्र पुर्ण झाल्याचा अनुभव जनतेला आलेला आहे. त्यामुळेच देशातील जनतेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गॅरंटी असून २०२४ च्या निवडणुकीचे संकल्प पत्र म्हणजे विकासाचे अधिष्ठान आहे, असे मत लातूर लोकसभा संयोजक तथा माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केले.



या पत्रकार परिषदेस भाजपा महायुतीचे लातूर मतदारसंघाचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे, आ. रमेशअप्पा कराड, लोकसभा प्रभारी किरण पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, माजी आ. बब्रुवान खंदाडे, प्रदेश प्रवक्त्या प्रेरणा होनराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपने जाहीर केलेल्या संकल्प पत्रासंदर्भात माहिती देताना आ. निलंगेकर म्हणाले की, भाजपच्या घोषणापत्रामध्ये तरूण, शेतकरी आणि महिलांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. तरुणांसाठी स्टार्टअपला चालना देण्याचे काम केले जाणार आहे. या माध्यमातून मोठ्या संख्येने रोजगार निर्माण होणार आहे. शेतकर्यांसाठी विविध नाविण्यपूर्ण योजना राबविण्यात येणार आहेत. शेतकरी व सरकार यांच्यात थेट संपर्क स्थापित केला जाणार आहे. शेतकर्यांसाठी शेतीला पाणी हा महत्वाचा विषय असून त्या अनुषंगाने काम केले जाणार आहे. शेतीमध्ये तंत्रज्ञानाचा वापर अधिक वाढावा यासाठी सरकार काम करणार असल्याचे आ. निलंगेकर यांनी सांगितले.

आ. निलंगेकर म्हणाले की, मोदी सरकारने नारी शक्ती कायदा मंजुर केला आहे.यातून महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणार आहे. देशातील एक कोटीहून अधिक महिलांना लखपती बनविले जाणार आहे. देशाच्या आर्थिक उलाढालीत आज महिलांचे प्रमाण केवळ १२ टक्के आहे.आगामी पाच वर्षात ते २५ टक्के करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भारत आज जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून महिलांचा सहभाग वाढला तर आपण लवकरच तिसर्या क्रमांकावर पोहोचणार आहोत. देशात मागील दहा वर्षात मुलभूत सुविधांवर मोठे काम झाले आहे. देशात महामार्गांचे जाळे विणले गेले असून आता रेल्वेचे जाळे तयार केले जात आहे. समान नागरी कायदा लागू करण्यासाठी सरकार काम करणार आहे. आ. निलंगेकर यांनी सांगितले की, विकासाचे व्हिजन ठेवून काम करणारा व विचारांचे अधिष्ठान असणारा भाजपा हा एकमेव पक्ष आहे. धर्म व संस्कृती जपण्याचे काम मोदी सरकारने केले असून या संदर्भात ठोस धोरण आखले जाणार आहे. लातूर मतदार संघाबाबत बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की, मागील दहा वर्षात जिल्ह्यात महामार्गांचे जाळे तयार झाले. रेल्वे कोच प्रकल्प कार्यान्वित झाला. खा. सुधाकर श्रृंगारे यांनी रेल्वेच्या प्रश्नांसाठी पाठपुरावा केला. पाच वर्षापूर्वी लातूर येथून केवळ एक रेल्वे धावत होती आज २४ गाड्या लातूर येथून धावतात. आगामी काळात चाकूर येथे रेल्वे जंक्शन स्थापित करण्यासंदर्भात रेल्वेने निर्णय घेतलेला आहे. कोविडसारख्या संकटात केंद्र सरकार लातूरकरांच्या पाठिशी उभे राहिले. त्यातूनच लातूर येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्मीती झाली. समाजातील सर्व घटकांसाठी सरकारने विविध योजनांचा लाभ दिला. आगामी पाच वर्षात पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी व केंद्रीय विद्यापीठ निर्मितीसाठी आम्ही काम करणार आहोत, अशी माहिती आ. निलंगेकर यांनी दिली. खा. सुधाकर श्रृंगारे यांनी मतदार संघात प्रचाराच्या चार फेर्या पूर्ण केल्या आहेत. ३२५ गावांपर्यंत ते पोहोचले असून प्रत्येक गावात पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे. ठिकठिकाणी जनतेचा प्रचंड प्रतिसाद उमेदवार श्रृंगारे यांना मिळत असल्याचेही आ. निलंगेकर यावेळी बोलताना म्हणाले.

### लातूर लोकसभा मतदारसंघात मंगळवारी पाच नामनिर्देशनपत्र दाखल

लातूर, : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ४१–लातूर



लोकसभा मतदारसंघात मंगळवार, १६ एप्रिल २०२४ रोजी तीन उमेदवारांनी पाच नामनिर्देशनपत्रे दाखल केली. तसेच १२ व्यक्तींनी १७ नामनिर्देशनपत्रे प्राप्त करून घेतली. लातूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्याकडे सुधाकर तुकाराम शृंगारे (भारतीय जनता पार्टी) यांनी एक, श्रीधर लिंबाजी कसबेकर (राष्ट्रीय संत संदेश पक्ष) यांनी तीन, सुरेश दिगंबर कांबळे (अपक्ष) यांनी एक असे एकूण पाच नामनिर्देशनपत्रे १६ एप्रिल रोजी दाखल केले. आतापर्यंत दाखल झालेल्या एकूण नामनिर्देशनपत्रांची संख्या ६ झाली असून आतापर्यंत एकूण ५६ व्यक्तींनी १०७ नामनिर्देशनपत्रे प्राप्त करून घेतली आहेत.

### बेळगावातील काँग्रेसच्या रॅलीमध्ये डी. के. शिवकुमार, धिरज देशमुख सहभागी

बेळगाव : बेळगाव लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार मृणाल हेब्बाळकर यांच्या प्रचारार्थ बेळगाव येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने निघालेल्या रॅलीमध्ये कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यासह लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख सहभागी झाले होते. मृणाल हेब्बाळकर यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. बेळगाव लोकसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार मृणाल हेब्बाळकर यांनी आपला उमेदवारी अर्ज सोमवारी (ता. १५) दाखल केला. त्यानंतर अलोट जनसमुदायाच्या उपस्थितीत रॅली काढण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार, उपस्थित होते.




# आदिवासी गायरान जमिनीवरील अनधिकृत श्रावण इलेक्ट्रिकलसचे बांधकाम उध्वस्त करा
## केशव मुद्देवाड यांची जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी ; आमरण उपोषणाचा इशारा

भोकर / सिद्धार्थ जाधव / भोकर तालुक्यातील मौजे वाकद येथील आदिवासी गायरान पट्ट्याची जमीन विनापरवाना खरेदी करून त्यावर उभारलेले श्रावण इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीचे बांधकाम तात्काळ पाडून सदर आदिवासी गायरान जमीन शासन खात्यात जमा करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते केशव रामा मुद्देवाड यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली असून त्या विरोधात दि.१३ मे २०२४ पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

भोकर जवळील वाकद गावामध्ये आदिवासी समाजाचे गायरान पट्ट्याच्या जमिनी देण्यात आल्या आहेत अशाच प्रकारे चालू गट क्र. – १११ जूना सर्व्हे नं ०९ मधील गायरान जमीन आंध आदिवासी समाजातील दत्ता मुगाजी वागतकर , पांडुरंग मोहन शिरमवाड व दिगांबर गोविंद टिप्परसे यांच्या नावाने आदिवासी पट्ट्याच्या जमिनी होत्या. या जमिनीची वापर कसून खाण्यासाठी करण्यात यावे असे विदित




आहे. सदर मालमत्ता खरेदी विक्री करण्याकरिता शासनाची परवानगी घ्यावी लागते. परवानगी घेऊन खरेदी विक्रीचा व्यवहार झाल्यावरही सदर जमीन केवळ शेतीसाठी वापरावे असे दंडक आहे. परंतु या तीन आदिवासी बांधवांच्या जमिनी जात लपवून व खोटे दस्तऐवजाच्या आधारे श्रावण इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीचे मालक बालाजी गणपतराव कंठेवाड व त्यांच्या पत्नी शर्मिला बालाजी कंठेवाड यांच्या नावे फेरफार करून नमुना आठ वर नोंद घेण्यात आली आहे. खोटे दस्तावेज व जात लपवून फेरफार केलेल्या जमिनीचे गहाणखत करून अभ्युदय बँकेतून बालाजी कंठेवाड यांनी २५ कोटीचे कर्ज देखील उचलले आहे खोट्या दस्तावेज आधारे जमीन ताब्यात घेत शासनाची फसवणूक केल्याचा आरोप केशव मुद्देवाढ यांनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. सदर अवैधरीत्या केलेले श्रावण इलेक्ट्रिकलचे बांधकाम उध्वस्त करून गायरान जमीन शासन खाती जमा करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी केली असून या विरोधात आमरण उपोषणाचाही इशारा दिला आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# चाणक्य नीति : जीवनात यश मिळवण्यासाठी पुरुषामध्ये हे ५ गुण असणे अत्यंत आवश्यक

आचार्य चाणक्य यांनी त्यांच्या निती शास्त्रामध्ये जीवनाशी संबंधित अनेक पैलू सांगितले आहेत आणि सांगितले आहे की मनुष्यामध्ये असे कोणते पाच गुण आहेत ज्यांमुळे तो नेहमी यशस्वी होऊ शकतो.



कठोर परिश्रमाने मिळेल यश : चाणक्यच्या मते, जे मेहनती असतात त्यांना अपयशाचा सामना करावा लागत नाही. एखाद्या व्यक्तीला कठोर परिश्रमाचे फळ निश्चितच मिळते, म्हणूनच व्यक्तीने कधीही कठोर परिश्रमापासून मागे हटू नये.

आत्मविश्वासामुळे मिळेल यश : आचार्य चाणक्य यांनी सांगितले आहे की, ज्यांच्यामध्ये आत्मविश्वास भरलेला असतो, त्यांना जीवनात कोणत्याही कामात अपयशाचा सामना करावा लागत नाही. कठीण परिस्थितीतही ते यश मिळवतात.

ज्ञान होऊ देणार नाही अपयशी : आचार्य चाणक्य यांच्या मते, ज्ञानी व्यक्ती जीवनात कधीही अपयशी होत नाही. ज्ञान कोणतेही असो आणि ते कुठून मिळवले जाते, ते एक ना एक दिवस नक्कीच उपयोगी पडते.

दक्ष राहिल्यास मिळेल यश : आचार्य चाणक्य म्हणतात की जे सतर्क राहतात, ते सहजासहजी अपयशी होत नाहीत. कोणतेही काम करताना पूर्ण तयारी असली पाहिजे, यामुळे नेहमी यश मिळते.

पैसा सर्वात महत्वाचा: चाणक्य सांगतात की पैसा ही माणसाची सर्वात मोठी गरज आहे. श्रीमंत व्यक्ती सहजासहजी अयशस्वी होत नाही, म्हणूनच आयुष्यात नेहमी पैसा सोबत ठेवावा.

# नात्यात वाढलेला दुरावा कमी करायचाय? या ५ खूप महत्त्वाच्या टिप्स

एखादं नातं फुलायला बराच वेळ लागतो, पण नातं तुटायला एक क्षण पुरेसा होतो. लहान सहान गोष्टींमुळे नात्यात दुरावा येतो. अनेकदा नात्यात येणाऱ्या दुराव्यासाठी त्या दोन्ही व्यक्ती जवाबदार असतात, हे नाकारता येणार नाही. या जगात प्रत्येक माणसात काहीनाकाही गुण आणि दोष असतातच. तुम्ही त्या व्यकतीत काय शोधता किंवा त्या व्यक्तीचा कसा विचार करता हे महत्त्वाचे असते. जर तुमच्या नात्यात दूरावा येत असेल तर त्याची कारणे काय असू शकतात हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत..



का रे दुरावा, का रे अबोला अपराध माझा असा काय झाला?

१. चुका मान्य करा

चुका माणसांकडूनच होतात हे लहानपणापासूनच आपल्याला सांगितलं जातं. तुम्ही वाद न घालता चुक मान्य केली तर समोरची व्यक्ती जास्त वेळ तुमच्यावर राग धरुन राहत नाही. तुमच्यात चुक मान्य करण्याची क्षमता असली पाहिजे. तुमच्या चुकांचे तुमच्याजवळ गणित असले पाहिजे. ती चूक पुन्हा होणार नाही याची जवाबदारी तुम्हाला घेतली पाहिजे आणि समोरच्याला ही त्याची खात्री पटवली पाहिजे.

२. नात्याला महत्त्व द्या

तुमचे पहिलं प्राधान्य हे तुमच्या नात्याला असावं. तुम्ही दोघांनीही एकमेकांना समान महत्त्व दिलं पाहिजे. नात्याची जवाबदारी ही कुणा एकट्यावर न पडता दोघांनींही घेतली पाहिजे. अशावेळेस नातं जड वाटत नाही. यामुळे नात्याचं महत्त्व टिकून राहतं, यातूनच एकत्र राहण्याची इच्छा समजते.

३. चांगला वेळ एकमेकांसोबत घालवा

चांगल्या आठवणी जमा करा, जेणेकरुन चांगलाच वेळ घालवण्याची सवय लागेल. वाईट वेळ घालवणे किंवा वाईट आठवणींना उजाळा देऊन त्यावर भांडत बसणे यात शहाणपणा नाही. यामुळे तुमच्याजवळ भावना व्यक्त करण्यासाठी कमी वेळ राहिल आणि मग शेवटी त्याचा तुम्हाला पश्चाताप होईल.

४. संवाद साधताना अपमान नसावा

तुमच्या संवादाने, तुम्ही वापरणाऱ्या शब्दांनी कोणत्याही प्रकारचं शोषण होणार नाही याची काळजी तुम्हाला घ्यावी लागेल. तुमचा संवाद हा समोरच्याला अपमानकारक वाटेल असा नसावा. जर असा संवाद असल्यास तुमचे नाते फार काळ तग धरु शकत नाही.

५. कोणालाही बदलण्याचा प्रयत्न करु नका

बदल हा परिवर्तनाचा नियमच आहे. पण एखादी व्यक्ती जन्मत: तशीच असल्यास त्या व्यक्तीला पूर्णपणे बदलण्याचा प्रयत्न ना केलेला बरा. ती व्यक्ती जशी आहे तसंच तिला अक्सेप्ट करणं गरजेचं आहे. अशाने नातं फुलायला चांगलीच संधी मिळते. जर एखाद्या व्यक्तीस व्यसन किंवा वाईट सवयी असल्यास त्या व्यक्तीमध्ये योग्य तो बदल तुम्ही करु शकता.

# १४ वर्षांपर्यंतच्या मुलांनाही होत आहे मधुमेह, ही चार लक्षणे दिसताच करा तातडीने उपचार

एक काळ असा होता की वयाच्या पन्नाशीनंतर मधुमेह व्हायचा, पण आता चित्र बदलत आहे. विशेष म्हणजे १४ वर्षांपर्यंतची मुले या आजाराला बळी पडत आहेत. बऱ्याच प्रकरणांमध्ये, पालकांना देखील मुलांमध्ये या आजाराची लक्षणे समजू शकत नाहीत. त्यामुळे शरीरात हा आजार वाढत आहे. जो वाढत्या वयाबरोबर धोक्याचा बनत चालला आहे. खराब जीवनशैली, वाढता लठ्ठपणा आणि जनुकीय कारणांमुळे मुले मधुमेहाचे बळी ठरत असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. या आजाराची व्याप्ती झपाट्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत मुलांमध्ये मधुमेहाची लक्षणे आणि उपचार जाणून घेणे आवश्यक आहे.



२५ टक्के मुलांमध्ये मधुमेहाचे प्रकार २ आहेत. खराब जीवनशैलीमुळे हा आजार किती वेगाने वाढत आहे, हे यावरून दिसून येते. इतर प्रकरणांमध्ये, शरीराच्या स्वयंप्रतिकार प्रतिक्रियामुळे मुलांना हा रोग होतो. या आजारामुळे आरोग्य बिघडू लागते आणि इतर आजार होण्याचा धोकाही असतो. मधुमेहाचा परिणाम हृदय, किडनी आणि इतर अवयवांवरही होतो.

वाढत्या वयानुसार ही समस्या वाढू लागते. अशा परिस्थितीत मुलांमध्ये मधुमेहाची लक्षणे जाणून घेणे आवश्यक आहे. हा आजार वेळीच ओळखला गेला तर भविष्यात इतर गंभीर आजार होण्याचा धोकाही कमी राहतो.

याबाबत तज्ज्ञ स्पष्ट करतात की लठ्ठपणामुळे ग्रस्त असलेल्या मुलांना मधुमेहाचा धोका जास्त असतो. आजकाल चुकीच्या आहारामुळे लठ्ठपणाची समस्या वाढत आहे. मधुमेहाच्या रुग्णांमध्ये वाढ होण्यामागे लठ्ठपणा हेही एक प्रमुख कारण आहे. लहान मुलांमध्ये लठ्ठपणा हे महामारीसारखे वाढत आहे.

तज्ज्ञ म्हणतात की कोविड नंतर मुलांच्या जीवनशैलीत खूप बदल झाला आहे. खेळाच्या सवयी कमी झाल्या असून फोनचा वापर वाढला आहे. या आरामशीर जीवनशैलीमुळे लठ्ठपणाही वाढत आहे. जंक फूड खाण्याची वाढती सवय हे देखील शरीरावर चरबी जमा होण्याचे कारण आहे. अशा परिस्थितीत मुलांची जीवनशैली आणि आहार व्यवस्थित असावा, याची काळजी पालकांनी घेतली पाहिजे.

मुलांमध्ये दिसतात मधुमेहाची ही लक्षणे

रात्री अंथरुण ओले करणे
कमी पाणी पिऊनही वारंवार लघवी होणे
सर्व वेळ थकवा जाणवणे
भूक न लागणे

अशा प्रकारे करा बचाव

मुलांच्या रक्तातील साखरेची पातळी तपासा
पालकांना मधुमेह असल्यास, जन्मानंतर बाळाची तपासणी करा
डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे मुलांना इन्सुलिन द्या
मधुमेहाची लक्षणे दिसल्यास त्वरित उपचार करा.

# त्यांच्या वाणीतून....

तुम्ही नवरात्रीच्या काळात मासे खात आहात. तुम्हाला काय संदेश द्यायचा आहे? मासे, डुक्कर, कबूतर, हत्ती किंवा घोडा तुम्ही जे काही खात आहात ते खा. दाखवायची काय गरज आहे? हे फक्त मतांसाठ तुष्टीकरणाचे राजकारण आहे. ते त्यामुळे एका विशिष्ट धर्माचे लोक त्यांना मतदान करतील, असे वाटते.

– संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

राहुल गांधी यांच्या ट्रेनला फक्त इंजिन आहे. पण डब्बे नाहीत. इंजिनमध्ये कोणाला बसण्याची संधी असते का? इंजिनमध्ये केवळ चालक बसतो. त्यांच्याकडे इंजिनही एक नाही. राहुल गांधी म्हणतात मी इंजिन आहे, शरद पवार म्हणतात मी इंजिन आहे, उद्धव ठाकरे म्हणतात मी इंजिन आहे. ममता बॅनर्जी म्हणतात मी इंजिन आहे. त्यामुळे त्यांचे सर्व इंजिन विरुद्ध दिशेने चालले आहेत. हे इंजिन कोणी बारामतीकडे ओढते तर कोणी मुंबईकडे ओढते, अशी परिस्थिती असल्यामुळे त्यांचे इंजिन जाग्यावरचे हालत नाही. अशी ठप्प गाडी घेऊन राहुल गांधी चालले आहेत.

– उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाचे लोकसभा निवडणुकीतील संकल्प पत्र जाहीर केले आहे, ती म्हणजे केवळ घोषणाबाजीच आहे. देशाला समर्थपणे पुढे नेत जनतेचा आर्थिक स्तर उंचावण्याची कोणतीही योजना त्यात नाही.

– पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अरविंद शिंदे

# (गुरु वचन)
# प्रेम स्वातंत्र्याची किंमत नव्हे! : ओशो

आम्हाला सर्व हवे आहे पण आम्हाला प्रेम स्वातंत्र्याच्या किमतीवर नकोय. आपल्याला दोन्ही कसे मिळू शकते? मला माझे स्वातंत्र्य हवे आहे. मी माझ्या प्रेयसीला स्वातंत्र्य देतो पण मला तिचे लक्ष ठेवण्याच्या रुपात दु:ख मिळते. प्रेयसीला स्वातंत्र्य देण्याचा तुमचा विचारच चुकीचा आहे. प्रेयसीला स्वातंत्र्य देणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही प्रेम करू शकतात व तुमच्या प्रेमात स्वातंत्र्य आहे. ही गोष्ट दुसऱ्याला देण्यासारखी नाही. जर देण्यास आली तर तिच अडचण येईल जिचा तुम्ही सामना करत आहात.

खरंतर तुम्ही स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. तुम्हाला वाटेल की, स्वातंत्र्य देण्यासारखी परिस्थितीच निर्माण होऊ नये पण तुम्ही अनेकदा मला प्रेम स्वातंत्र्य देते, हे सांगताना ऐकले असेल म्हणून स्वातंत्र्य देण्यासाठी स्वत:वर दबाव टाकतात कारण तुमचे प्रेम, प्रेम नसते.

तुम्हाला एका अवघड प्रश्नात अडकले आहात. जर तुम्ही स्वातंत्र्य दिले नसते तर तुम्हाला प्रेमावर संशय आला असता. जर तुम्ही इच्छा नसूनही स्वातंत्र्य दिले तर हजार प्रश्न निर्माण होतात. तुम्ही तुमच्या प्रेयसीसाठी पुरेसे नाहीत? की तिला दुसऱ्याची साथ हवी म्हणून तिला स्वातंत्र्य हवे आहे? यामुळे दु:ख होते व तुम्ही विचार करतात की, तुम्ही आपल्यापेक्षा कमी महत्व देतात.

तिला स्वातंत्र्य देऊन तुम्ही इतरास पहिले ठेवले व नंतर स्वत:ला. हे अंहकाराविरुद्ध आहे व यामुळे काही फायदा होणार नाही कारण तुम्ही जे स्वातंत्र्य दिले आहे त्यासाठी तुम्ही बदलणार.

दुसरी गोष्ट म्हणजे जर तुमची प्रेयसी दुसऱ्यासोबत राहिली असेल तर तुम्हाला आपल्या प्रेयसीसोबत राहणे वेगळे वाटेल. यामुळे तुमच्या व तिच्यात अडथळा निर्माण होईल. तिने दुसऱ्याची निवड केली आहे व तुम्हाला सोडून दिले आहे किंवा तिने तुमचा अपमान केला आहे.

व तुम्ही तिला खुप काही दिले आहे, तुम्ही उदार होत आहोत, तुम्ही तिला स्वातंत्र्य दिले आहे. तुम्हाला दुखावल्यासारखे जाणवत आहे म्हणून तुम्ही तिला कुठल्यातरी रुपात दुखवाल.

पण हे सर्व गैरसमजामुळे होते. मी हे म्हणालो नाही की, तुम्ही प्रेम करत असाल तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागेल. नाही मी म्हणालो आहे की, प्रेम स्वातंत्र्य आहे. येथे प्रश्न देण्याचा नाही. जे जसे आहे त्याला तसेच राहू द्या. विनाकारण गुंतागूंत का वाढवायची? अगोदरच अनेक अडचणी आहेत.

जर तुमचे प्रेम त्या पातळीपर्यंत आले आहे की, स्वातंत्र्य तिचे अंग बनले आहे तेव्हा तुमच्या प्रेयसीला परवानगी घेण्याची गरजच राहणार नाही. जर मी तुमच्या जागी असतो व माझ्या प्रेयसीने परवागनी मागितली तर मला दु:ख झाले असते. याचा अर्थ तिला माझ्या प्रेमावर विश्वास नाही. माझे प्रेम स्वातंत्र्य आहे. मी तिच्यावर प्रेम केले आहे याचा अर्थ असा नव्हे की, मी सर्व मुभा दिली ज्यामुळे ती कुणासोबतही हसू शकेल, कुणासोबतही नृत्य करु शकेल, कुणावर प्रेम करु शकणार नाही कारण आपण कोण आहोत?

आपण कोण आहोत? हा मुळ प्रश्न आहे, जो सर्वांनी केला पाहिजे. आपण सर्व अनोळखी आहोत व या आधारावर आपण सांगू शकतो की, मी तुला स्वातंत्र्य देईल किंवा मी तुला स्वातंत्र्य देणार नाही. जर तु माझ्यावर प्रेम करत असेल तर दुसऱ्यावर प्रेम करू शकत नाही? या सर्व मूर्ख गोष्टी आहे पण या सर्व मानवावर सुरुवातीपासून हावी राहिल्या आहेत व आपण अजूनही असभ्य आहोत. प्रेम काय असते? हे आपणास अजूनही माहित नाही.

जर मी कुणावर प्रेम करत असेल तर मी त्या व्यक्तीप्रती कृतज्ञ असतो की तिने मला प्रेम करू दिले, तिने माझे प्रेम स्वीकारले. हेच पुरेसे आहे. मी तिच्यासाठी कैदखाना बनत नाही. तिने माझ्यावर प्रेम केले व बदल्यात मी तिच्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? मी तिच्यावर प्रेम केले व बदल्यात ती माझ्या चहुबाजूस कैदखाना बनवत आहे? आम्ही एकमेकांना चांगला पुरस्कार देत आहोत.

जर मी कुणावर प्रेम करतो तेव्हा मी तिचा कृतज्ञ असतो व तिचे स्वातंत्र्य कायम असते. मी तिला स्वातंत्र्य दिले नाही. हा तिचा जन्मसिद्ध हक्क आहे व माझे प्रेम तिचा हक्क हिरावून घेऊ शकत नाही. तुमचे प्रेम असलेल्या व्यक्तीकडून तुम्ही तिचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकता? मी तिला स्वातंत्र्य देतो असे सुद्धा तुम्ही म्हणू शकत नाही. तुम्ही कोण आहात? एक अनोळखी. तुम्ही दोघे योगायोगाने रस्त्यावर भेटले व तो महान आहे की, त्याने तुमचे प्रेम स्वीकारले. त्याच्याप्रती कृतज्ञ रहा व ज्याप्रमाणे जगू इच्छिता त्याप्रमाणे त्यास जगू द्या व तुम्हाला जसे जगायचे असेल तर जीवन जगा. तुमच्या जीवनशैलीत कुणी हस्तक्षेप करणार नाही. यास स्वातंत्र्य म्हणतात. तेव्हा प्रेम कमी तणावपूर्ण, कमी चिंताग्रस्त, कमी क्रुद्ध व जास्त प्रसन्न होण्यास मदतगार ठरेल.

जगात नेमके याउलट होत आहे. प्रेम खुप दु:खदायी असते व असेही लोक आहेत जे अखेरीस कुणावरही प्रेम न चांगले असा निर्णय घेतात. ते आपल्या मनाचे दरवाजे बंद करतात.

पण प्रेमासाठी दरवाजा बंद करण्याचा अर्थ वास्तविकतेकडे, अस्तित्वाकडे पाठ फिरवणे आहे म्हणून मी याचे समर्थन करणार नाही. मी म्हणेन की, प्रेमाचे संपूर्ण स्वरूप बदला.

# उपदेशकथा
## जिद्द

डॉ. येलप्रगदा सुब्बाराव हे आंध्र प्रांतातील एक विख्यात वैद्य होते. त्यांच्या घरची परिस्थिती गरिबीची होती. त्यांच्या भावाचा मृत्यू स्प्रू म्हणजे प्रवाहिका नावाच्या रोगाने झाला. त्यावर त्यावेळी औषध नसल्याने ते औषध तयार करण्याची त्यांनी प्रतिज्ञा केली व ती शेवटी सिद्धीस नेली. मद्रास विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. मित्रमंडळींच्या सहाय्याने ते इंग्लंडला गेले. लंडन विद्यापीठात प्रवेश केला. नंतर अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात प्रवेश मिळवून १९३० मध्ये त्या विद्यापीठाची डॉक्टरेट पदवी मिळविली. तेथेसुद्धा पैशाच्या अडचणीमुळे हॉस्पिटलमधील शिपायाचे काम करणे, प्रयोगासाठी बेवारशी कुत्री व मांजरे पकडणे वगैरे हलकी कामे करावी लागली पण त्यांनी त्यात कमीपणा मानला नाही. दूध व शिजवलेले पावटे हा त्यांचा आहार होता. लॅडर्ली लॅबोरेटरीचे १९४२ मध्ये प्रमुख झाले. टेरॉटटेरिन व ॲमिनॉप्टिरिन नावाची कर्करोगावर व ल्युकेमियावर उपयोगी पडणारी औषधे त्यांनी तयार केली. लेडर्ली संस्थेतील वाचनालयास व भारतातील त्या कंपनीच्या कारखान्यास त्यांचे नाव देण्यात आले.

कथा उपदेश : जिद्दीने प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते व नाव कमावता येते.

# लातूर लोकसभेसाठी राष्ट्रीय संत संदेश पार्टीच्यावतीने अॅड.श्रीधर कसबेकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

लातूर : लातूर लोकसभेची लगबग शिगेला पोहचली असुन उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी जोरदार तयारी केली असुन उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख १९ असल्या कारणाने उमेदवार आपला उमेदवारी अर्ज भरण्यासाठी लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात गर्दी करू लागले आहेत.



लातूर लोकसभा मतदारसंघातून ४१ (अ.जा.) मधून राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे अधिकृत आणि भारतीय जनविकास महाआघाडीचे पुरस्कृत उमेदवार म्हणून ॲड. श्रीधर लिंबाजी कसबेकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. हा उमेदवारी अर्ज दाखल करत असतांना राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र वनारसे, ॲड.शिवकुमार स्वामी औंढकर, भास्करराव चव्हाण रामेश्वरकर, उमेश उघडे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर एकत्र आले. त्यानंतर उमेदवारी अर्ज दाखल करताना उमेदवार ॲड.श्रीधर लिंबाजी कसबेकर यांचा उमेदवारी अर्ज जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी स्वतः स्विकारला. याप्रसंगी राष्ट्रीय संत संदेश पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र वनारसे, ॲड. शिवकुमार स्वामी औंढकर, भास्करराव चव्हाण रामेश्वरकर यांची उपस्थिती होती.

# राशीभविष्य १७ एप्रिल २०२४

मेष: शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम

अडकलेला पैसा मिळेल. सामाजिक कामात रस घ्याल. भावाच्या मदतीमुळे व्यवसायात फायदा होईल.दुसऱ्याच्या कामात निष्कारण हस्तक्षेप करू नका.

वृषभ : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: दक्षिण

नौकरीमध्ये वरीष्ठांकडून सहकार्य मिळेल. खरेदी–विक्रीमध्ये फायदा होईल. आनंदी वातावरण राहील. मशनरी हाताळतांना सावधगिरी बाळगा. आर्थिक उत्तन्नात वाढ होईल.

मिथुन : शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम

नौकरी करणाऱ्यांवर अधिकारी संतुष्ट असतील. कामामध्ये मन लागेल. कौटुंबिक समस्येकडे दुर्लक्ष करू नका.

कर्क :शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व

कामामध्ये कुटुंबातील सदस्याची मदत मिळाल्याने उत्साह वाढणार आहे. आरोग्य चांगले राहील. कायदेशीर प्रकरणात सावधानी बाळगा.

सिंह : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: दक्षिण

साहस व पराक्रमात वाढ होईल. एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीशी संबध येती. व्यावसायिक प्रकरणात घेतलेला निर्णय योग्य राहील आपल्या व्यसनांवर नियंत्रण असणे अवश्यक आहे

कन्या : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम

एखादे अडकलेले काम पूर्ण झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक मतभेद मिटतील. बोलतांना जिभेवर नियंत्रण ठेवा.

तुळ : शुभ रंग:निळा,शुभ दिशा:दक्षिण

राजकीय, सामाजिक कामामुळे फायदा होईल. इच्छेनुसार बदली, पदोन्नती होण्याचे योग आहेत. मित्रांशी वाद होण्याची शक्यता आहे. रोजगार संबंधातील कामे पूर्ण होईल.

वृश्चिक :शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:दक्षिण

विचारपूर्वक केलेल्या कामात फायदा होईल. राजकीय क्षेत्रात किंवा व्यवसायातील निर्णय फायदेशीर राहतील. फुकटचा मोटेपणा दाखवू नका. स्तुतीपासून दूर रहा. मुलांचे जिवन आनंदी राहील.

धनु : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व

नवीन व्यवसाय सुरू केला तर फायदेशीर राहील. जीवनसाथीच्या सन्मानामुळे सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आरोग्याची समस्या हल होईल. नातेवाईंकाशी असलेले संबंध मर्यादित ठेवा.

मकर : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पश्चिम

व्यापारात स्व:ताच्या मताने काम करा. स्थावर मालमत्ता खरेदी करण्याचा योग आहे. जीवनसाथीशी संबंध दृढ होतील. रागावर नियंत्रण राखा.

कुंभ : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम

आपल्या विचारांना महत्व मिळेल. व्यावसायिक सफलता मिळेल. कामात व्यस्त रहाल. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष द्यावे. शुत्रंचे षडयंत्र यशस्वी होणार नाहीत.

मीन : शुभ रंग: केसरी: शुभ दिशा: पूर्व

नौकरीत बढतीचे योग आहेत. कौटुंबिक जिवन आनंदी राहील. आर्थिक स्थिती चांगली असल्यामुळे आनंदी रहाल. बोलण्यावर नियंत्रण असू द्या. मनोरंजनाच्या संधी मिळतील.

१७ एप्रिलला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, नेपच्यून, शनी व मंगळाचा प्रभाव आहे. तुमचा स्वभाव थोडासा गंभीर आहे. आयुष्याकडे तुम्ही काहीशा गंभीर दृष्टिकोनातून पाहता तुमच्या जीवनात फेरबदल, चढउतार होण्याची बरीच शक्यता असते. त्यामुळे स्थैर्य मिळवण्याला तुम्ही प्रथम महत्व देता. आपल्या निर्णयांचा भविष्यात काय परिणाम होईल याचा विचार केल्याखेरीज तुम्ही कोणताही निर्णय घेत नाही. पैशाची जास्त उधळपट्टी तुम्हाला खपत नाही. आपण बरे आपले काम बरे या वृत्तीने तुम्ही आपल्याच कामात मग्न असता.

पैसा जपून खर्च करण्याची वृत्ती असल्याने लोक तुम्हाला कंजूष समजतात. थोडी जीवनाकडे रसिक वृत्तीने बघण्याची दृष्टी ठेवा. शिस्तीचा अतिरेक करू नका. गुडघे, घोटे, सांधेदुखी यांच्या विकारांना तुम्ही लवकर बळी पडाल, शीतपेये, आंबट पदार्थांचा वापर टाळा.

कार्यक्षेत्र : सातत्याने व चिकाटीने काम करण्याची वृत्ती असली तरी तुमचा भाग्योदय काहीशा मंदगतीनेच होतो.

# इतिहासात आजचा दिवस १७ एप्रिल

अंतरराष्ट्रीय

१७११ – चार्लेस पाचवा हब्सबर्ग ऑस्ट्रीयाचा राजेपदी.

१८७५ – सर नेवीली केंबरलेन यांनी ’स्नुकर’ विकसित केले.

१९४६ – फ्रान्सकडून सिरियाला स्वातंत्र्य घोषित करण्यात आले.

१९५६ – बलगारियाचे पंतप्रधान टीचरवेनको यांनी राजीनामा दिला.

१९७१ – शेख मुजीबूर रेहमान यांनी बांगलादेशच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यांना देशद्रोहाच्या आरोपावरून अटक करून पाकिस्तानात रवाना करण्यात आले.

१९७५ – रॉबर्ट मुगाबे झांबियाक्षे पंतप्रधान बनले.

२००६ – पश्चिम कोलंबियात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे दरड कोसळून २९ जण ठार झाले.

२००७ – पाकिस्तानमध्ये आपल्या १३ नातेवाईकांची हत्या करणाऱ्या चार भावांना फाशी देण्यात आली.

राष्ट्रीय

१९८३ – भारताच्या रोहिणी–डी–३ उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.

२००२ – स्वामी सच्चिदानंद यांना संयुक्त राष्ट्रसंघाचे युथांट शांततापदक.

२००६ – आंध्र प्रदेशात वीज कोसळल्याने १६ जण ठार झाले.

२००७ – जम्मूत बस दरीत कोसळल्याने १३ जण ठार झाले.

जन्म

१६७६ – स्वीडनचे राजा फ्रीड्रीक पहिला (वान हेसन कसेल) याचा जन्म.

१८७० – अमेरिकी पत्रकार रे स्टनर्ड बेकर याचा जन्म.

१९०४ – भारतीय कसोटी क्रिकेट संघाचा सलामी फलंदाज नऊमल जीओमल याचा जन्म.

१९०६ – न्यु रोटरडम डेली या वृत्तपत्राचे मुख्य संपादक एम रुई याचा जन्म.

१९१६ – जगातील पहिल्या महिला पंतप्रधान श्रीलंकेच्या सिरीमावो भंडारनायकेंचा जन्म.

१९४६ – क्लेर फ्रान्सिस या साहसमय कादंबऱ्यांची लेखिका आणि लेखक बनण्यापूर्वी एकटीने २९ दिवसांत अटलांटिक पार करणाऱ्या यॉट्सवुमनचा जन्म.

निधन

०८१८ – इटलीचा राजा ब्रनहर्ड पहिला याचे निधन.

०८५८ – इटालीयन पोप बेंडीकेट तिसरा याचे निधन.

१९४६ – भारत सेवक समाजाचे संस्थापक–सदस्य श्रीनिवास शास्त्री यांचे निधन.

१९९३ – तुर्कीचे राष्ट्रपती तुरगत ओझल याचे निधन.

१९९७ – इस्त्राईलचे राष्ट्रपती चेम हरझोग याचे निधन.

**लल्ला ..**

अयोध्या राऊळात
विराजे रामलल्ला
स्वागतास मोहरला
हर गल्ली मोहल्ला
विसरून जात धर्म
आबालवृद्ध कल्ला
दीर्घ प्रतिक्षा पश्र्चात
गाठला लांब पल्ला
मतांचे रे राजकारण
कुणी भरतातगल्ला
धोपटू नका दंडाला
कोण सांगेलं मल्ला
जोर धरुन रामनाम
बांधी कुणी किल्ला
आम्ही खरे रामसेवी
घेऊन फिरती बिल्ला
रामाचा घेती आधार
प्रतिपक्षा करी हल्ला
नकळत पातकवासी
क्षमापार जाई दल्ला
राजकारण न बदनाम
कोणदेईल का सल्ला
जाणून घ्या रामायणा
बंद करावा हा हिल्ला

**प्रतिष्ठापना ...**

सुसंपन्न सद् मुहूर्त
स मूर्त प्रतिष्ठापना
पाचशे वर्षे प्रतिक्षा
प्रत्यक्षां ये कल्पना
राम लल्ला विराजे
प्रत्येकांचे मनोमना
अयोध्या राममंदिर
परिपूर्ण हो कामना
सत्यरुप मिळेस्वप्ना
आनंद सकल जना
निमीत्त कारसेवक
प्रभूआपली योजना
पारणे फिटे अक्षाचे
अलौकिक रे रचना
मनोभावे भक्त करी
महा पुजा सेवार्चना
निवांत शांत पणाने
जावेअयोध्यादर्शना
भावभक्ती ही शक्ती
नको वाव प्रदर्शना
हात जोडले घरातून
राघवा पोचे भावना
एकदा भेटे अयोध्या
नक्की हो संभावना

**-- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६..**

# केंद्रातील भाजपाची सत्ता जनता उलथवून टाकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही,

**माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख नाभिक समाज लातूर जिल्हा मेळावा संपन्न**



लातुर प्रतिनिधी : भाजप सरकारने दहा वर्षात काय काम केले हे सांगावे, सध्या भलत्याच मुद्द्यावर निवडणूक लढवायची, राजकीय पोळी भाजायची हम करे सो कायदा करायचा, ढुंकूनही समाजाकडे पाहायचे नाही, अशी सत्ताधाऱ्यांची जुलमी राजवट राज्यात व देशात चालू आहे. केंद्रातील भाजपाची सत्ता जनता उलथवून टाकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा विश्र्वास माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केला.

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दि. १५ एप्रिल रोजी दुपारी लातूर शहरातील रिंग रोडवरील रुक्मिणी मंगल कार्यालय (लक्ष्मी प्रयाग हॉल) येथे नाभिक समाज लातूर जिल्हा मेळावा संपन्न संपन्न झाला. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळचे प्रदेश उपाध्यक्ष रामदास पवार, लातूर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब शेंद्रे, प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, लातूर शहर काँग्रेस अध्यक्ष किरण जाधव, लातूर शहर विधानसभा मतदारसंघ निरीक्षक सर्जेराव मोरे, बारा बलुतेदार संघटनेचे अध्यक्ष अजित निंबाळकर, लातूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, एकनाथ पाटील, व्हा. चेअरमन समद पटेल, सचिन बंडापल्ले, इम्रान सय्यद, हरिभाऊ गायकवाड, जगन्नाथ गवळी आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व मान्यवरांनी संत सेना महाराजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

*काँग्रेसचे व नाभिक समाजाचे*
*अतूट नाते आहे*
माजी मंत्री आमदार अमित देशमुख

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यावेळी बोलतांना म्हणाले की, नाभिक समाज नेहमीच काँग्रेस पक्षाच्या समवेत राहिला आहे. काँग्रेसचे व नाभिक समाजाचे अतूट नाते आहे. माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, लोकनेते विलासराव देशमुख, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख आणि मला व लातूर ग्रामीणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांना त्यांनी भरभरून आशीर्वाद दिले आहेत. नाभिक समाजाला हा व्यवसाय आता परवडत नाही. महागाई वाढली आहे, उत्पन्न कमी झाले आहे. मग घर कस चालवावे हा प्रश्न त्यांना पडत आहे. नाभिक समाज जो व्यवसाय करतो त्याच्या शुल्कात वाढ झाली पाहिजे, इतर राज्याप्रमाणे जिल्हाप्रमाने लातूरातही शुल्क वाढ नाभिक समाजाने व्यवसायात करावी. पूढे बोलतांना म्हणाले, महायुतीच्या काळात भ्रष्टाचार फोफावला आहे, महाविकास आघाडीच्या काळात असे नव्हते. महायुतीने पक्ष फोडले, घर सुद्धा फोडले या निवडणुकीत वेळ आली आहे, मतदारांना भाजपने आपण दहा वर्षात आपण काय केले हे सांगावे. पण सत्ताधारी हे निवडणूक भलत्याच मुद्द्यावर लढवत आहेत. स्वताची राजकीय पोळी भाजायची, हम करे सो कायदा करायचा, ढुंकूनही समाजाकडे पाहायचे नाही, अशी सत्ताधाऱ्यांची जुलमी राजवट राज्यात व देशात चालू आहे असे त्यांनी सांगितले.

*केंद्र सरकारने घोषणा केलेले उद्योग*
*मराठवाड्यात आले नाहीत*
माजी मंत्री आमदार अमित देशमुख

पुढे बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्राला राजकारणाची उज्वल परंपरा आहे, फोडाफोडीच्या राजकारणाची महाराष्ट्राची परंपरा नाही. देशातील सामान्य माणूस यामुळे चिडला आहे. दोन कोटी सुशिक्षित बेकारांना रोजगार देतो म्हणाले मोदी सरकार पण त्यांनी त्या दिल्या नाहीत. लातूरची अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे, त्यासाठी आवश्यक असलेले बँक कारखाने सुरळीत चालू आहेत. केंद्र सरकारने घोषणा केलेले उद्योग मराठवाड्यात आले नाहीत. आज काँग्रेस नेते राहुल गांधी देशाचे नेतृत्व करतात, काँग्रेसने जाहीरनाम्यात महिलांना एक लाख रुपये वर्षाला मिळतील तसेच महिलांना सरकारी नोकरीत ५० टक्के आरक्षण असेल, ज्याची जेवढी लोकसंख्या तेवढे अधिकार त्याला मिळावेत, म्हणून काँग्रेस जातीनिहाय जनगणना करणार आहे. सुशिक्षित बेकारांना नोकरीची हमी, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव देण्यासाठी हमीभाव कायदा हे देशात काँग्रेसची सरकार आल्यावर करण्यात येणार आहे असे ते म्हणाले.

*विद्यमान भाजप खासदाराला कुठे भेटायचे*
*हेच लोकांना आतापर्यंत माहित नव्हते* माजी मंत्री आमदार अमित देशमुख

माजी मंत्री आमदार अमित देशमुख यावेळी बोलतांना म्हणाले, लातूरचा विद्यमान भाजप खासदाराला कुठे भेटायचे हेच लोकांना आतापर्यंत माहित नव्हते. डॉ.काळगे यांचे रुग्णालय लातूर शहरातील लातूर जिल्हा परिषदेच्या मागे आहे. तुम्हा तक सहज उपलब्ध होतील. केंद्रातील भाजप सरकारने २२ उद्योगपतीचे १६ लाख कोटी कर्ज माफ केले, परंतु त्यांनी शेतकऱ्यांची कर्जमाफी केली नाही. शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्यानंतर शेतकरी आत्महत्या कमी होतील. जीएसटीचा भडीमार सध्या होत आहे, लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.शिवाजी काळगे यांच्या प्रचारात नाभिक समाज बांधवांनी सक्रिय सहभाग घ्यावा, नाभिक समाजाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षातर्फे तिकीट देण्यात येईल, नाभिक समाज काँग्रेसच्या विचारांशी एकरूप आहे, बारा बलुतेदारांना आम्ही न्याय देऊ. संविधान बदलण्याची भाषा भाजपवाले करतात, ओबीसी विरुद्ध मराठा समाजात त्यांनी भांडण लावण्याच काम केले. नाभिक समाजाच्या सर्व मागन्या आम्ही तत्वतः मान्य केल्या आहेत, असे सांगून त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले.

*सर्वसामान्य जनतेकडून*
*आम्हाला प्रेम विश्र्वास मिळत आहे*
डॉ. शिवाजी काळगे

लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, लातूर लोकसभा मतदारसंघात सर्वसामान्य जनतेकडून आम्हाला प्रेम विश्र्वास मिळत आहे. प्रचारात आपण आघाडी घेतली आहे. नाभिक समाज जनतेशी जुडलेला आहे. मी ही सर्वसामान्य लोकांची मागच्या २६ वर्षापासून सेवा करत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, सुशिक्षित बेरोजगार, महिला, व्यापारी यांचे अनेक प्रश्न सोडवण्यासाठी येत्या ७ मेला हाताच्या चिन्हा समोरील बटन दाबून सर्वांनी विक्रमी मताधिक्याने विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

*आपल्या नेतृत्वानी कधीही*
*जातीपातीचे राजकारण केले नाही*
माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे

माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे म्हणाले की, नाभिक समाजाचे संत सेना महाराज मंदिर लातूर शहरात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उभे केले, त्याला त्यांनी निधी दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ओबीसी समाजाला फसवत आहेत, त्यांनी या समाजासाठी काही केले नाही. संविधान वाचवण्यासाठी आपणाला एकत्र यायचे आहे, लोकनेते विलासराव देशमुख व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही. भाजप जनतेवर अन्याय अत्याचार करते, आम्ही सर्वजण नाभिक समाजासोबत आहोत आपणाला देश वाचवायचा आहे, असे सांगून त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले.

*काँग्रेसची देशात सत्ता आल्यानंतर*
*जातीनिहाय जनगणना केली जाईल*
अभय साळुंखे

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंखे म्हणाले की, नाभिक समाजाकडे गुणवत्ता आहे, आज देश संकटात आहे, देशाला लुटल जात आहे. स्वतःच्या मित्रांसाठी संपत्ती देशाची खर्च केली जात आहे. काँग्रेसची देशात सत्ता आल्यानंतर जातीनिहाय जनगणना केली जाईल. देशातील सर्व स्वायत्त संस्था नष्ट केल्या जात आहेत, त्यासाठी नाभिक समाजाने काँग्रेसच्या पाठीशी उभे राहावे. ओबीसी व मराठा समाज हे वर्षानुवर्ष सखे भाऊ म्हणून राहतात पण भाजपने दहा वर्षात समाजात भांडणे लावली. ओबीसी विरुद्ध मराठा समाज असे त्यांनी भांडण लावले. आज गरज आहे देश वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे. लोकनेते विलासराव देशमुख यांनी जो रस्ता आम्हाला दाखवला त्या मार्गाने आम्ही जातो, असे सांगून त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन केले.

*दोन समाजात भांडणे लावणाऱ्यांना*
*या निवडणुकीत धडा शिकवू*
माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे

माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे म्हणाले की, नाभिक समाजाचे काम मोठे आहे. भाजप काळात गोरगरीब लोकांना गावगाड्यात त्रास होत आहे. भाजपने ओबीसी व मराठा समाजात भांडण लावले, मराठा समाज सर्वांना सोबत घेऊन चालणार आहे. आपण भांडणे लावणाऱ्यांना या निवडणुकीत धडा शिकवू, असे सांगून त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघ महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हात या चिन्हा समोरील बटन दाबून त्यांना विक्रमी मताधिकाने विजयी करावे असे आवाहन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळ लातूरचे जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब शेंद्रे यांनी करून नाभिक समाजाच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज वाघमारे यांनी केले तर शेवटी आभार अजित निंबाळकर यांनी मानले.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची स्वस्त धान्य दुकानदार संघटना लातूर शिष्टमंडळान घेतली भेट विविध विषयावर केली चर्चा

लातुर प्रतिनिधी : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची मंगळवार दि. १६ एप्रिल रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी स्वस्त धान्य दुकानदार संघटना लातूर शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली.

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी स्वस्त धान्य दुकानदार यांचे सर्व प्रश्न सोडवले जातील, त्यांनी लातूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणावे असे आवाहन केले.

यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे लातूर जिल्हाध्यक्ष सुधाकर पाटील, सचिव राजू पाटील, इंद्रजीत यादगिरे, मतुषार माकणे, संतोष चव्हाण, मंगेश चव्हाण आदीसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# भाजपाचे संकल्पपत्र हे...

**(पान १ वरुन)** पुढच्या पाच वर्षांत आणखी भरघोस वाढ करण्याची 'मोदी की गॅरंटी' आहे. डाळी आणि खाद्यतेल उत्पादनात आत्मनिर्भरता आणण्याची ग्वाही, भाजीपाल्यासारख्या नाशवंत पिकांचे उत्पादन वाढवून त्याच्या साठवणीकरिता स्वयंपूर्ण सुविधा उभ्या करून या पिकांना व उत्पादकांना आर्थिक सुरक्षितता देण्याचा मोदींचा संकल्प आहे. श्री अन्न योजनेकरिता जगभरातील बाजारपेठा उपलब्ध करून देऊन नैसर्गिक शेतीच्या विस्ताराच्या ठोस योजना आखण्यात आल्या आहेत. गेल्या पाच वर्षांत मोदी सरकारच्या नियोजनातून सुमारे २५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आली. पुढच्या पाच वर्षांत सिंचनक्षेत्रात आणखी भर घालण्याच्या ठोस योजनाही तयार आहेत, असे ते म्हणाले.

नॅनो युरिया हा मोदी सरकारचा प्रयोग यशस्वी ठरला आहे. त्याची व्यापक अंमलबजावणी करण्यात येणार असून जमिनीचा पोत टिकविण्याकरिता कार्यक्रम हाती घेतला जात आहे. शेती क्षेत्रावर वातावरणातील बदलाचे परिणाम अभ्यासून पिकांना संरक्षण देण्याकरिता स्वतंत्र उपग्रह सोडण्यात येणार असून या क्षेत्रातील लहान शेतकऱ्याकरिता पूर्णपणे उपलब्ध राहील असे डिजिटल तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरुणांकरिता पारदर्शक भरती प्रक्रिया, पेपरफुटीविरोधात कडक कायदा, स्टार्टअप्सच्या माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी आणि कौशल्याची क्षितिजे विस्तारण्याकरिता विशेष निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी माहितीही त्यांनी दिली.

उत्पादनक्षेत्राचा विस्तार करून जागतिक स्पर्धेत भारताला अव्वल दर्जा प्राप्त करून देणे व या क्षेत्रातील रोजगाराच्या संधींचा पुरेपूर फायदा घेता यावा यासाठी विशेष योजना, एमएसएमई क्षेत्राचा विस्तार, करप्रणालीत सुटसुटीतपणा, व या क्षेत्रास अधिकाधिक पतपुरवठा ही रोजगार निर्मितीसाठी सहाय्यभूत ठरणारे संकल्पही जाहीर केले आहेत. विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगारांकरिता किमान वेतनात भरघोस वाढ, व कायमस्वरूपी धोरणाची आखणी करण्यात येणार आहे. एक कोटी महिला गेल्या पाच वर्षांत लखपती दीदी झाल्या. पुढच्या पाच वर्षांत तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनवून सक्षम करण्याची मोदी सरकारची गॅरंटी आहे, असे त्यांनी सांगितले.

महिलांकरिता सार्वजनिक शौचालयांची साखळी, महिलांच्या आरोग्याच्या समस्यांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करणारे धोरण आखण्यात येणार असून, गर्भाशय व मुखाचा कर्करोगासारख्या आजारातू महिलांना पूर्णतः मुक्तता मिळवून देणारी योजना आखण्यात येत आहे. नारीशक्ती वंदन योजनेतून महिलांच्या सक्षमीकरणाची अंमलबजावणी, महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता पोलीस ठाण्यात विशेष यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे. रेल्वे सेवेचे जाळे वाढवून प्रवासी वाहतुकीची क्षमता वाढविण्याची योजना तयार करण्यात येणार असून दर वर्षी पाच हजार किलोमीटर नवे रेल्वेमार्ग तयार करण्यात येतील. रेल्वे अपघात टाळणारी कवच यंत्रणा, जागतिक दर्जाच्या रेल्वेस्थानकांचे आधुनिकीकरण, वंदे भारत, अमृत भारत, नमो भारत ट्रेनचा विकास व निर्मिती देशातच होणार असून सुमारे १३ हजारांहून अधिक रेल्वे स्थानकांचा जागतिक दर्जाचा विकास करण्याचे काम सुरू झाले आहे.

भारत ही आर्थिक शक्ती म्हणून उदयास येत आहे. त्याप्रमाणे देशात सांस्कृतिक जागरणाची प्रक्रियादेखील वेगवान झाली आहे. काशी कॉरिडॉर, अयोध्येतील राम मंदिराचे पुनर्निर्माण, आदी सांस्कृतिक वारशाचा विकास, संस्कृती आणि परंपरांचे जतन व संवर्धन करण्यासाठी विशेष निधी उभारण्याबरोबरच, साहित्य, संस्कृतीच्या जागतिक प्रसारासाठी विशेष प्रयत्न केले जाणार असून भारताचा वैश्र्विक विचार जगात स्थापित करण्याचा प्रयत्न करण्याचा मोदी यांचा संकल्प आहे, असेही श्री.फडणवीस म्हणाले. भ्रष्टाचाराविरोधातील लढाई आणि राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मधील देशाच्या कर्तव्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे आखून देण्यात आलेली आहेत. संपूर्ण देशात समान नागरी कायदा असावा ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची अपेक्षा ७५ वर्षांत पूर्ण झाली नाही. आता हा कायदा देशभर लागू करण्यात येणार आहे, अशी घोषणाही त्यांनी यावेळी बोलताना केली. भारतीय सभ्यतेची प्रतीके पुनरुज्जीवित करून अमली पदार्थ विरोधातील लढाई तीव्र करण्याचा मोदी यांचा संकल्प आहे. 'सीएए'ची व्यापक अंमलबजावणी, सुरक्षा दलांची क्षमतावृद्धी आणि विशेष म्हणजे, एक देश, एक निवडणूक या धोरणाची अंमलबजावणी ही मोदी यांची गॅरंटी आहे, असे त्यांनी सांगितले. आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणाचे देशव्यापी कार्यक्रम राबविण्याचा भाजपाचा संकल्प आहे. २०१९ मध्ये मोदी सरकारने दिलेल्या जाहीरनाम्यातील सर्व ७५ आश्र्वासने पूर्ण करण्यात आली आहेत असे सांगून फडणवीस यांनी त्या जाहीरनाम्यातील पूर्ण करण्यात आलेल्या संकल्पांची यादीच यावेळी सादर केली.

## पक्षाची विजयी पताका घेवून उमेदवाराच्या पाठीशी रहा : आ. संभाजी पाटील निलंगेकर

लातूर/प्रतिनिधी : लातूर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांचा विजय निश्चित आहे. पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विजयी पताका घेवून उमेदवाराच्या पाठीशी रहावे, असे आवाहन माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केले.

आ. निलंगेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर शहर मतदारसंघातील सिध्देश्वर मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंडळ, महात्मा बसवेश्वर मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज मंडळ, दयानंद सरस्वती मंडळ, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर मंडळतील बुथ प्रमुखांच्या बैठका संपन्न झाल्या. या बैठकांना मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर बोलत होते.

या बैठकांना डॉ. अर्चनाताई पाटील चाकुरकर, लोकसभा प्रभारी किरण पाटील, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, शहर विधानसभा प्रमुख गुरुनाथ मगे, प्रदेश उपाध्यक्ष अजीत पाटील कव्हेकर, प्रदेश प्रवक्त्या प्रेरणाताई होनराव, महिला आघाडी शहराध्यक्षा रागिनी यादव, लोकसभा विस्तारक सिध्देश्वर पवार, सुधीर धुत्तेकर, ॲड. शैलेश गोजमगुंडे, ॲड. दिपक मठपती, ॲड. दिग्वीजय काथवटे, मंडल अध्यक्षा शोभाताई पाटील, मिनाताई गायकवाड, माजी नगरसेवक अनंत गायकवाड, सुनिल मलवाड, संगीत रंदाळे, मिनाताई भोसले, सुनील होनराव, प्रदीप मोरे, सुरेश राठोड, दिलीप धोत्रे, श्रीधर सोनटक्के, अरविंद शिंदे, विकास पाचपिडे, महेश महाले, पांडुरंग पवार, सुधाकर दोडके आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर म्हणाले की, आता भाषणाचा काळ संपला आहे. प्रत्येक बुथवर बैठका घेतल्या जात आहेत. मी स्वतः जिल्ह्यातील प्रत्येक बुथवर जात आहे. लातूर मतदारसंघात आजही भाजपाचेच वर्चस्व आहे. ते आपल्याला मतदानातून दाखवून द्यायचे आहे. आपले उमेदवार खा. सुधाकर श्रृंगारे यांना लातूर शहर मतदारसंघातून सर्वाधिक मताधिक्य मिळेल याची मला खात्री आहे. बुथप्रमुख हेच पक्षाचे स्टार प्रचारक आहेत. त्यांच्या पाठबळावरच आपले उमेदवार गतवेळपेक्षा अधिक मताधिक्याने विजयी होतील असेही आ. निलंगेकर यांनी यावेळी सांगितले.

# महात्मा बसवेश्र्वरमध्ये महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमालेचे आयोजन

लातूर श्री. महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थ, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात गेली ४४ वर्ष अविरतपणे सुरू असणारी प्रतिष्ठित महात्मा बसवेश्र्वर व्याख्यानमाला यावर्षी दि. १८ ते २० एप्रिल २०२४ या कालावधीमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासिकेत दररोज सायं. ५.०० वा. आयोजित करण्यात आली आहे.

या व्याख्यानमालेचा उद्घाटन समारंभ श्री. महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे यांच्या शुभ हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांची उपस्थिती असणार आहे. पहिले पुष्प देगलूर येथील सुप्रसिद्ध लेखक व शरण साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. रवींद्र बेंबरे हे महात्मा बसवेश्र्वर आणि महाराष्ट्र एक अनुबंध या विषयावर गुंफणार असून प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, आयक्युएसी समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, संयोजक डॉ. मनोहर चपळे आणि नामदेव बेंदरगे आदीची उपस्थिती राहणार आहे.

या व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प सोलापूर येथील सुप्रसिद्ध साहित्यिका तथा मसापच्या अध्यक्षा प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर ह्या योगिनी अक्कमहादेवीच्या विचारांची प्रासंगिकता या विषयावर गुंफणार असून अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, आयक्युएसी समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, संयोजक डॉ. मनोहर चपळे आणि नामदेव बेंदरगे आदीची उपस्थिती राहणार आहे.

दि. २० एप्रिल २०२४ रोजी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प आणि समारोप श्री महात्मा बसवेश्र्वर शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक ॲड. श्रीकांतप्पा उटगे यांच्या अध्यक्षस्थानी संपन्न होणार असून प्रमुख वक्ते म्हणून एबीपी माझाचे धारशिवचे प्रतिनिधी राहुल कुलकर्णी हे समाज माध्यमांची विश्र्वासार्हता या विषयावर आणि जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय, लातूर स्वीप कक्ष प्रमुख आकाश सोनकांबळे हे लोकशाहीचे रंगतरंग या विषयावर गुंफणार आहेत. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, आयक्युएसी समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, संयोजक डॉ. मनोहर चपळे आणि नामदेव बेंदरगे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या व्याख्यानमालेचा लाभ शहरातील मान्यवर, नागरिक, अभ्यासक, समीक्षक, प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, पालक, विद्यार्थी आणि बसवप्रेमींनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, आयक्युएसी समन्वयक डॉ. आनंद शेवाळे, संयोजक डॉ. मनोहर चपळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि व्याख्यानमाला संयोजन समितीचे सहसंयोजक डॉ. रत्नाकर बेडगे, सदस्य डॉ. शीतल येरुळे, प्रा. व्यंकट दुडीले, डॉ. अश्र्विनी रोडे, प्रा. किसनाथ कुडके, डॉ. टी. घनश्याम, प्रा. कल्पना गिराम आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी विद्यार्थिनींनी केले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894